Sl. No.	Description	Date and time of auction	Reserved Price. (Rs.)	EMD (Refundable)	Bid Incremental amount (Rs.)
1.	Corporate Debtor as a whole (as going concern)	05.08.2024 Monday from 11:00 am to 5:00 pm	38,00,000/-	3,80,000/-	5000/-

1. The sale will be done by the under signed through e-auction platform.
2. E- Auction will be conducted on "AS IS WHERE IS, WHATEVER THERE IS AND WITHOUT RECOURSE BASIS" through service provider, M/s e-procurement Technologies Limited on E-Auction platform: https://ncltauction.auctiontiger.net
3. The EMD (refundable as per terms of Assets Sale Process Memorandum) shall be payable by interested bidders through demand draft/pay order/NEFT/RTGS Bank transfer on or before 03.08.2024 in account of "Transtreasure Services (India) Private Limited Resolutional Account" account details shall be shared on e-mail or on e-auction document.
4. For detailed terms and conditions of e-auction and particulars of assets offered e-auction process document may be obtained from the liquidator Mr. Rajiv Bajaj by sending email cirptrans@gmail.com and contact no.8800794355.
5. Last date of submission of EOI by the interested bidder is 19.07.2024 and declaration of qualified bidder is 21.07.2024.
6. Last date of submission of EMD is 03.08.2024.
7. The liquidator has right to accept or cancel or modify or extend any terms and conditions of the e-auction.

Date: 04.07.2024 **Rajiv Bajaj**

Place: Mumbai Liquidator of TRANSTREASURE SERVICES INDIA PRIVATE LIMITED

IBBI/IPA-002/IP-N00276/2017-18/10834

AFA Valid till 07.12.2024

FORM G

INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST FOR MEDYBIZ PRIVATE LIMITED

OPERATING IN THE BUSINESS OF INVESTMENT AND FINANCIAL INTERMEDIATION SERVICES

(Under regulation 36 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

RELEVANT PARTICULARS

1.	Name of the corporate debtor along with PAN/ CIN/ LLP No.	**Medybiz Private Limited** CIN: U72200MH2000PTC294957 PAN: AACCM0084D
2.	Address of the registered office	Office of corporate debtor: Manek Mahal, 6th Floor, 90 Veer Nariman Road, Mumbai, Maharashtra, India - 400020
3.	URL of website	Not available
4.	Details of place where majority of fixed assets are located	Mumbai
5.	Installed capacity of main products/ services	No information available
6.	Quantity and value of main products/ services sold in last financial year	No information is available on quantity. The Corporate Debtor booked NIL revenue from operation (other income is Rs. 28,500) as per audited financial statements for FY 2022-23. Financial statements for FY 2023-24 are not available.
7.	Number of employees/ workmen	No information available
8.	Further details including last available financial statements (with schedules) of two years, lists of creditors are available at URL:	Details can be sought by sending email at **medybiz.987@yahoo.com**
9.	Eligibility for resolution applicants under section 25(2)(h) of the Code is available at URL:	Details can be sought by sending email at **medybiz.987@yahoo.com**
10.	Last date for receipt of expression of interest	20-07-2024
11.	Date of issue of provisional list of prospective resolution applicants	30-07-2024
12.	Last date for submission of objections to provisional list	04-08-2024
13.	Date of issue of final list of prospective resolution applicants	14-08-2024
14.	Date of issue of information memorandum, evaluation matrix and request for resolution plans to prospective resolution applicants	19-08-2024
15.	Last date for submission of resolution plans	18-09-2024
16.	Process email id to submit Expression of Interest	**medybiz.987@yahoo.com**

IPE- NPV INSOLVENCY PROFESSIONALS PRIVATE LIMITED

(Formerly Known as Mantrah Insolvency Professionals Private Limited)

Through its Director - Mr. Ritesh Prakash Adatiya

Appointed as Resolution Professional In the matter of Medybiz Private Limited

IBBI Reg. No: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021

Date: 5th July 2024 **Email For Correspondence - medybiz.987@yahoo.com**

Place: Ahmedabad **AFA validity up to:** 14.01.2025

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

पावसाचा दिलासा नाही

'नेमेचि येतो पावसाळा', असे म्हणत असताना या पावसाळ्याबरोबर त्याच्या नेहमीच्या लहरीपणाचाही अनुभव येत असतो. वेधशाळांनी यंदाच्या पावसाबाबत बरेच दिलासादायक अंदाज व्यक्त केले आहेत. पहिल्या जून महिन्यातसुद्धा सगळीकडे चांगला पाऊस होईल असा अंदाज व्यक्त झाला होता. शेतकरी त्या अंदाजानुसार पेरणीच्या तयारीत होता तर सरकारी यंत्रणासुद्धा जून महिन्यातल्या पावसावर पाणीपुरवठ्याचे अंदाज बांधत होत्या. परंतु अपेक्षेप्रमाणे पाऊस झाला नाही. आज संपूर्ण राज्याचा विचार केला तर पेरणीला आवश्यक असलेला असा उत्तम पाऊस कुठेही झालेला नाही. महाराष्ट्राच्या अनेक भागांत पाऊस कोसळलेला आहे. साधारणपणे जून अखेरपर्यंत पेरण्या पूर्ण होतात. आणि त्या पेरण्यांना आवश्यक असा पाऊसही हवा असतो. पहिल्या एक दोन पावसानंतर शेतजमिनीतल्या वाफेचा अंदाज घेऊन शेतकऱ्यांना पेरणीबाबतचा निर्णय घ्यावा लागतो. आणखी पावसाची वाट पाहिली तर नुकसान होण्याची शक्यता असते. म्हणून आहे त्या पावसावर समाधान मानून शेतकरी पेरण्यांची कामे पूर्ण करण्याच्या मागे असतात. तशा राज्यातल्या साठ ते सत्तर टक्के भागांत पेरण्या झालेल्या दिसतात आणि आता पावसाची प्रतीक्षा आहे. आठ दहा दिवस मागेपुढे पाऊस होईल असा अंदाज बांधून शेतकरी जोखीमही स्वीकारतात. पुढच्या सप्ताहाच्या अखेरीपर्यंत महाराष्ट्राच्या सर्व भागांत जर पुरेसा पाऊस झाला नाही तर मात्र दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते. जे शेतकऱ्यांसाठी आर्थिक फटका देणारेही ठरते. कारण पेरणीबरोबरच खतांचाही वापर सुरू होतो. पावसाळ्यापूर्वी बी बियाणे आणि खतांसाठी शेतकऱ्याने करून ठेवलेली तरतूद पावसाच्या या लहरीप्रमाणे वाया जाणारी ठरू शकते. सध्या तरी राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाच्या या लहरीपणाचा शेतकरी अनुभव घेतो आहे. शेतीच्या या वेळापत्रकात फार मोठा बदल करता येत नाही. ज्वारी, बाजरी, भुईमूग, कपाशी यासारख्या पिकांना किमान दीड महिन्याची मुदत गरजेची ठरते.

शेतकऱ्याला प्रतीक्षा

आज तशीच परिस्थिती राज्यातील पाणी पुरवठ्याबाबत झालेली आहे. जून अखेरीपर्यंत राज्यातल्या सर्व जलसाठ्यांमध्ये पुरेसा पाऊस येईल आणि पाणीपुरवठ्याबाबत दिलासादायक परिस्थिती निर्माण होईल याचा अंदाज होता. तोही जवळपास चुकीचा ठरलेला आहे. आता फक्त आषाढातल्या पावसावर शेतकरी आणि सरकारी यंत्रणांची भिस्त आहे. मात्र आजच्या परिस्थितीचा विचार केला तर सर्वदूर पाणी संकट गडद झालेले आहे. गेल्या वर्षी जून अखेरीपर्यंत राज्याच्या महत्त्वाच्या जलसाठ्यांमध्ये बऱ्यापैकी पाऊस झाला होता. परिणामी जुलैअखेरपर्यंत अनेक धरणं आणि जलसाठे भरली होती. ऑगस्टचा पाऊस हा तसा पाण्यासाठी बोनस ठरला होता. यंदा मात्र तशी परिस्थिती दिसत नाही. संपूर्ण जुलै महिन्यात म्हणजेच आषाढ महिन्याचा धो धो पाऊस कोसळला तरच पुरेसे पाणी जमा होऊ शकेल. अन्यथा पाणीटंचाईचे संकट नाकारता येत नाही. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग पाणीटंचाईच्या झळा अजूनही सोसतो आहे. स्वाभाविकपणे सरकारी यंत्रणांच्या वेळापत्रकानुसार अनेक ठिकाणी जूनअखेरपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करण्याचे धोरण आखले जाते. मात्र संपूर्ण जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नसल्याने राज्यातील बऱ्याच भागांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या मुदतीत वाढ करावी लागलेली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई उन्हाळ्यात तर प्रचंड प्रमाणामध्ये जाणवत असतेच. त्याला अनुसरूनच त्या त्या भागातल्या सरकारी यंत्रणा पाणी पुरवठ्याबाबतचा अंदाज घेत असतात. वेधशाळांच्या अगदी ताज्या अंदाजाप्रमाणे जून महिन्यात सर्वत्र चांगला पाऊस होण्याची शक्यता व्यक्त झाली होती. किंबहुना अगदी जुलै महिन्यातसुद्धा सगळीकडेच चांगला पाऊस होईल असेच वेधशाळेचे म्हणणे आहे. परंतु जून महिन्याचा अनुभव लक्षात घेतल्यानंतर आता अधिक सावधानता बाळगावी लागणार आहे. मराठवाड्यात अनेक भागांमध्ये मे महिन्यात पाणीटंचाई गंभीर स्वरूपाची झाली होती. काही ठिकाणी मे महिन्यातच अवकाळी पाऊस कोसळला आणि काही दिवसापुरती ही पाणीटंचाई दूरही झाली होती. परंतु आता पुन्हा पूर्वीसारखीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

शहरांचा पाणी पुरवठा गंभीर

पश्चिम महाराष्ट्रात जुलै महिन्यात तुडुंब पाऊस होतो. कृष्णा, पंचगंगा आदि नद्यांना महापूरही येतात. या सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन यावेळी कधी नव्हे ते सरकारी यंत्रणांनी काही पूर्वतयारी करून ठेवली आहे. कोकणातले दरडी कोसळण्याचे अनुभवही जमेस धरून एनडीआरएफसारख्या मदत पथकांना तयार ठेवले गेले आहे. एकीकडे महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागात ही परिस्थिती असताना शहरी भागातल्या पाणीपुरवठ्याचाही प्रश्न तितकाच गंभीर झालेला आहे. अगदी मुंबईसारख्या महानगराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलसाठ्यांची स्थिती अपेक्षेप्रमाणे सुधारलेली नाही. पहिले दोन तीन पाऊस येऊन गेल्यानंतर मुंबई, पुणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर या सगळ्याच महानगरांमध्ये पावसाने गुंगारा दिला आहे. मुंबईतला उकाडा आणखीनच वाढल्याने मुंबईकर हैराण होत आहे. ढगाळ वातावरण असूनही पाऊस येत नाही आणि अधिक दमट वातावरणामुळे मुंबईकरांचा एकाअर्थी कोंडमारा होतो आहे. गेल्या काही वर्षापासून पुणे, नाशिक, संभाजीनगर या शहरांच्या पाणीपुरवठ्याचे प्रश्न गंभीर होऊ लागले आहेत. या सगळ्या महानगरांची वाढ विचित्र पद्धतीने होते आहे. महानगरांच्या सर्वच बाजूंनी बांधकामांचे पेव फुटलेले दिसून येते. म्हणजे पिण्याच्या पाण्याची पूर्ण व्यवस्था नसताना महानगरपालिकांकडून बांधकामांना परवानगी दिली जाते. आणि एवढेच नव्हे तर नंतर भोगवटा प्रमाणपत्र म्हणजेच ओसी देऊन महानगरपालिका मोकळी होते. परिणामी लोक राहायला येतात आणि त्यांना पाण्याच्या भीषण समस्येला तोंड द्यावे लागते. महानगरपालिकादेखील कोणतीच उपाययोजना करू शकत नाही. आणि तिथल्या रहिवाशांना टँकरचा आधार घ्यावा लागतो. म्हणजे ग्रामीण भागात सरकारी टँकरने पाणी पुरवले जाते. तर शहरी भागात लोकांना खासगी पद्धतीने टँकरने पाणी मागवावे लागते, ही आज परिस्थिती आहे.

भारतीय हॉकीला पुन्हा संजीवनी मिळणार हॉकी इंडिया लीग याच वर्षी सुरू होणार

भारतात गेल्या काही दिवसात क्रीडा स्पर्धांना चांगले दिवस आले आहेत. लीग स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना चांगली कमाई करता येत आहे. आता हॉकीसाठी चांगले दिवस आले आहेत. ११ वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेली हॉकी इंडिया लीग पुन्हा एकदा सुरू करण्यात येणार आहे. पाच पर्व व्यवस्थितरित्या पार पडल्यानंतर ही स्पर्धा आर्थिक संकटामुळे बंद करावी लागली होती.

■ नवी दिल्ली

आयपीएलच्या धर्तीवर भारतीय हॉकीचा स्तर सुधारण्यासाठी आणि त्याला अधिक उंचीवर नेण्यासाठी हॉकी इंडियाने ११ वर्षांपूर्वी हॉकी इंडिया लीग सुरू केली होती. पण आर्थिक कारणास्तव ७ वर्षांपूर्वी बंद झालेली हॉकी लीग यावर्षी पुनरागमन करत आहे. यावेळी खेळाडूंवर पूर्वीपेक्षा जास्त पैशांचा वर्षाव केला जाईल. भारतीय राष्ट्रीय संघ आणि देशांतर्गत खेळाडूंव्यतिरिक्त जगभरातील अनेक बड्या खेळाडूंना यात भाग घेता येणार आहे. सात वर्षांपूर्वी या लीगला खूप पसंती मिळाली होती. त्यानंतर भारतीय हॉकीलाही त्याचा फायदा झाला होता. भारताने ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदकाची कमाई केली होती.

हॉकी इंडिया पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धे नंतर खेळाडूंची नोंदणी सुरू करणार आहे. आतापर्यंत सुमारे १००० देशांतर्गत आणि ५०० हून अधिक परदेशी खेळाडूंनी यात खेळण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आयपीएलच्या धर्तीवर या स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव होणार आहे. अहवालानुसार, आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान स्पर्धेसाठी खिडकी निश्चित केली आहे. यावेळीही पुरुष लीगसोबतच महिला लीग सुरू राहणार आहे यावेळी फ्रँचायझीला खेळाडूंवर खर्च करण्यासाठी पूर्वीपेक्षा जास्त पैसे मिळणार आहेत. देशातील ३० मोठ्या कॉर्पोरेट्सनी या स्पर्धेत फ्रँचायझी मिळवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. हॉकी इंडिया त्यांच्या संपर्कात आहे. त्यापैकी काही मालक असे आहेत की, त्यांच्या नावे आयपीएल आणि आयएसएल संघ आहेत. आयपीएलप्रमाणे या लीगमध्येही पाकिस्तानी खेळाडू दिसणार नाहीत. लीगच्या पहिल्या सत्रात पाकिस्तानी खेळाडूंना संधी मिळाली होती. पण जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय जवानांवर झालेल्या हल्ल्यानंतर या खेळाडूंना मध्येच सोडून जावे लागले.

वर्ल्ड चॅम्पियन ऑफ लिजेंड स्पर्धेत पाकिस्तानचा ऑस्ट्रेलियावर विजय

■ लंडन

वर्ल्ड चॅम्पियन्स ऑफ लिजेंड स्पर्धेत पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाचा ५ गडी राखून पराभव केला. पाकिस्तानचा कर्णधार युनिस खानने ४१ चेंडूत ६८ धावांची बहुमूल्य खेळी केली. त्यामुळेच पाकिस्तानला विजय मिळवता आला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजी दिली. ऑस्ट्रेलियाने फिन्चच्या ६८ धावांच्या खेळीवर २० षटकात १८९ धावा केल्या. त्यानंतर विजयासाठी आवश्यक असलेल्या १९० धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानने १९.४ षटकात १९१ धावा करून विजय मिळवला.

विम्बल्डनमध्ये कोकोगाफची आगेकूच; तिसऱ्या फेरीत धडक

■ लंडन

अमेरिकेची दुसऱ्या मानांकित कोकोगाफने आपली लय कायम राखताना विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत धडक मारली. यासह महिला एकेरीत ओन्स जाबेउर व अग्रमानांकित इगा स्वीयातेकनेही पुढची फेरी गाठली. पुरुष एकेरीत स्टेफानोस सितसिपासी, कार्लोस अल्कराझ, मेदवेदेवने पुढच्या फेरीतील आपले स्थान निश्चित केले. महिला एकेरीत गाफने आपल्या दुसऱ्या सामन्यात रोमानियाच्या एन्का टोडोनीला ६-२, ६-१ अशा फरकाने पराभूत केले.

जाहीर सूचना

मी, **भरत भुवरजी मारू** राहणार सदनिका क्र. २०२, २ रा मजला, साई कृपा बिल्डींग, अरविंद कॉलनी, एस. व्ही. रोड, विलेपार्ले (प), मुंबई - ४०००५६ याखाली लिहिलेल्या **अनुसूची** मध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली मालमत्ता (**"सबर मालमत्ता"**) श्री. भुवरजी नारन मारू (**"सबर भुवरजी"**) आणि आई सौ. शुशिला बी. मारू उर्फ सुशिलाबेन भुवरजी मारू (**"शुसिला"**) यांच्या कडून त्यांच्या मृत्युनंतर आणि तसेच हक्कसोड करारनाम्याच्या आधारे (याखाली वर्णन केल्यानुसार) वारसा हक्काने प्राप्त केली आणि संपादित केली आहे.

मी नमूद करतो की, मालमत्तेची याखाली नमूद केलेली मूळ कागदपत्रे इतर बाबींसोबतच हरवली/गहाळ झाली आहेत किंवा सापडत नाहीत; आणि माझ्या अत्यंत परिश्रमपूर्वक शोध घेऊन देखील ती सापडलेली नाहीत:

(अ) अंधेरी येथील हमीचे उप-निबंधक क्र. २ यांच्याकडे क्र. बीडीआर४-०९६९९-२००७ अन्वये योग्यरित्या नोंदणीकृत असलेल्या शुशिला यांच्याद्वारे बनविलेल्या आणि अंमलात आणलेल्या दिनांक २० डिसेंबर, २००७ रोजीच्या उद्घोषणा करारनाम्यासह श्री. विजय एम. कोटक आणि भुवरजी व शुसिला यांच्यादरम्यान बनलेल्या आणि अंमलात आणलेले दिनांक १९ नोव्हेंबर, १९९२ रोजीचे विक्री करारपत्र;

ब) साई कृपा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेद्वारे पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. २१ ते २५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले भाग प्रमाणपत्र क्र. ०५.

क) माझी भावंडे श्री. प्रकाश भुवरजी मारू, श्री. नविन भुवरजी मारू आणि सौ. हसुमती धिरज पोरिया उर्फ हसुमती भुवरजी मारू आणि मी स्वतः यांच्यादरम्यान बनलेल्या आणि अंमलात आणलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या हक्कसोड करारनाम्याद्वारे (यापश्चात **"हक्कसोड करारनामा"** असे उल्लेखित); आणि

ड) मालमत्तेशी संबंधित पत्रव्यवहार.

यापश्चात एकत्रितरित्या **"शीर्षक वस्तऐवज"** असे उल्लेखित.

मी असे नमूद करतो की, मी शीर्षक करारपत्रे कोणत्याही व्यक्ती/पक्षकाराकडे जमा केलेली नाहीत. कोणा व्यक्तींचा मालमत्ता आणि/किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध, मध्ये किंवा वर वारसा, विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, भाडेकरू, भाडेपट्टी, लिव्ह ॲण्ड लायसन्स, धारणाधिकार यामार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा असल्यास, किंवा अन्यथा कोणत्याही व्यक्तीकडे कोणत्याही व्यवस्था किंवा अन्य प्रकारे शीर्षक करारपत्राचा कायदेशीर ताबा असल्यास, त्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत अशा दावा किंवा आक्षेपाच्या समर्थनार्थ दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना **श्री. भरत भुवरजी मारू**, सदनिका क्र. २०२, २ रा मजला, साई कृपा इमारत, अरविंद कॉलनी, एस. व्ही. रोड, विलेपार्ले (प), मुंबई - ४०००५६ येथे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करावे, असे न केल्यास मी त्याचा असा अर्थ लावेन आणि स्वीकारेन की, असा कोणताही दावा किंवा आक्षेप अस्तित्वात नाही; आणि त्याचा असा अर्थ लावण्यात येईल की, ते अस्तित्वात नाहीत/सोडून दिले/गुंडाळून ठेवले आहेत आणि माझ्यावर बंधनकारक नसेल.

अनुसूची

मालमत्तेचे वर्णन

साई कृपा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. ०५ मध्ये समाविष्ट डिस्टिंक्टिव्ह क्र. २१ ते २५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेल्या रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग आणि त्याच्याशी संबंधित, अरविंद कॉलनी, एस. व्ही. रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०००५६ येथे स्थित गाव विलेपार्ले (पश्चिम), तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्ह्याचा सीटीएस क्र. ३६५ आणि ३६५/१ ते ३६५/४ धारण केलेल्या आणि मोजमाप ५००.४० चौरस मीटर्स किंवा साधारण तेवढ्याच मोठ्या जमिनीच्या तुकड्यावर बांधलेल्या आणि उभ्या असलेल्या **"साई कृपा"** इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०२ मोजमाप २९५ चौरस फूट समतूल्य २७.४१ चौरस मीटर्स कार्पेट क्षेत्रफळ.

दिनांक ५ जुलै, २०२४.

सही/-
श्री. भरत भुवरजी मारू

फॉर्म जी
गुंतवणूक आणि आर्थिक मध्यस्थी सेवांच्या व्यवसायामध्ये कार्यरत मेडीबिझ प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
(नादारी आणि दिवाळखोरीपणा (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन / सीआयएन / एलएलपी क्र.	**मेडीबिझ प्रायव्हेट लिमिटेड** सीआयएन - **U72200MH2000PTC294957** पॅन - **AACCM0084D**
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	कॉर्पोरेट ऋणकोचे कार्यालयः माणेक महल, ६ वा मजला, ९० वीर नरीमन रोड, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००२०.
३.	वेबसाईटचे यूआरएल	उपलब्ध नाही
४.	बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील	मुंबई
५.	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता	माहिती उपलब्ध नाही
६.	गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य	परिमाणाबाबत माहिती उपलब्ध नाही. कॉर्पोरेट ऋणकोने वित्तीय वर्ष २०२२-२३ करिता लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्रानुसार प्रचलनामधून कोणताही महसूल प्राप्त केला नाहीत (इतर उत्पन्न रु. २८,५००). वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता वित्तीय विवरणपत्र उपलब्ध नाही.
७.	कर्मचारी/कामगारांची संख्या	माहिती उपलब्ध नाही
८.	गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी उपलब्ध असणारे यूआरएलः	**medybiz.987@yahoo.com** येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील.
९.	संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएलः	**medybiz.987@yahoo.com** येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील.
१०.	स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक	२०.०७.२०२४
११.	संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक	३०.०७.२०२४
१२.	तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक	०४.०८.२०२४
१३.	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक	१४.०८.२०२४
१४.	संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक	१९.०८.२०२४
१५.	ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक	१८.०९.२०२४
१६.	ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी	**medybiz.987@yahoo.com**

आयपीई - एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड)
त्यांचे संचालक - श्री. रितेश प्रकाश अदाविया यांच्या द्वारे
मेडीबिझ प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणामध्ये ठराव व्यावसायिक म्हणून नियुक्त
आयबीबीआय नोंद. क्रमांकः IBBI/IPE-0040/ IPA-2/2022-23/ 50021
दिनांकः ५ जुलै, २०२४ पत्रव्यवहाराकरिता ईमेलः **medybiz.987@yahoo.com**
ठिकाणः अहमदाबाद एएफए वैधताः दि. १४.०१.२०२५ पर्यंत

इंडियन असोसिएशन ऑफ इन्व्हेस्टमेन्ट प्रोफेशनल्स
सीआयएनः U91990MH2005NPL152320
नोंद. कार्या.: ७ वा मजला, ७०२, ए विंग, सी/६६, जी ब्लॉक, वन बीकेसी, बँक ऑफ बडोदासमोर, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१.
वेबसाईटः www.cfasocietyindia.org, ईमेलः secretary@india.cfasociety.org

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदी आणि दिनांक ०५ मे, २०२०, १३ एप्रिल, २०२० आणि ०८ एप्रिल, २०२० रोजीच्या इतर परिपत्रकांसह वाचावयाच्या दिनांक २८ डिसेंबर, २०२२, ०५ मे, २०२२, १३ जानेवारी, २०२१ नंतर पारित केलेले २५ सप्टेंबर, २०२३ रोजीचे एमसीए परिपत्रकाच्या अनुषंगाने याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी त्यांची एकोणिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') शुक्रवार, दि. २६ जुलै, २०२४ रोजी सायं. ४.०० भाप्रवे वाजता व्हिडियो कॉन्फरन्सिंग ("व्हीसी") किंवा इतर दृक श्राव्य माध्यम ("ओएव्हीएम") द्वारे घेण्यात येणार आहे.

सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोल्लेखित परिपत्रकांच्या अनुषंगाने, आभासी एजीएमच्या सूचना त्या सर्व नियमित सदस्यांना ईमेलद्वारे पाठविण्यात येईल, ज्यांचे ईमेल कंपनीकडे नोंदणीकृत आहेत. कंपनी त्यांच्या सर्व नियमित सदस्यांना, ज्यांनी अद्याप त्यांचे ईमेल पत्ते नोंदविलेले नाहीत किंवा त्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे अद्ययावत केलेले नाहीत, त्यांना या सार्वजनिक जाहिरात प्रसिद्ध केल्याच्या ३ दिवसांमध्ये तसे करण्याची विनंती करीत आहे.

तुमचा ईमेल आयडी अद्ययावत करण्याकरिता, कृपया *https://membership.cfainstitute.org/managemembership* **येथे लॉगईन करावे.**

कंपनी एजीएम सूचना त्यांच्या वैयक्तिक नियमित सदस्यांना पाठवेल आणि ती त्यांच्या वेबसाईट www.cfasocietyindia.org वर अपलोड करतील. ती ई-मतदान प्लॅटफॉर्म म्हणजेच कंपनीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान सुविधा प्रदान करण्याकरिता नियुक्त केलेल्या अधिकृत एजन्सी, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') च्या www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध असेल.

कृपया नोंद घ्यावी की, एजीएम सूचना प्राप्त करण्याकरिता, मतदान करण्याकरिता आणि एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी होण्याकरिता फक्त नोंदणीकृत ईमेल आयडी विचारात घेण्यात येतील. दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमला उपस्थित राहण्याकरिता युजर आयडी आणि पासवर्ड एनएसडीएल द्वारे ईमेल-आयडी evoting@nsdl.com मार्फत सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर पाठविण्यात येतील.

सभेस जोडले जाण्याकरिता सुविधा नियोजित वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे आधी खुली करण्यात येईल आणि अशा नियोजित वेळेनंतर ३० मिनिटांच्या समाप्तीपर्यंत बंद करण्यात येणार नाही.

ईमेल पत्त्याच्या नोंदणीकरणाशी संबंधित कोणत्याही शंका असल्यास, सदस्य खालील ठिकाणी संपर्क करू शकतातः

तपशील	नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरी लिमिटेड	इंडियन असोसिएशन ऑफ इन्व्हेस्टमेन्ट प्रोफेशनल्स
नाव आणि हुद्दा	श्री. अभिजीत गुंजाळ सहाय्यक व्यवस्थापक	कु. शेफाली जैन उप मुख्य - वित्त आणि अनुपालन
पत्ता	४ था मजला, ट्रेड वर्ल्ड, ए विंग, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३.	७ वा मजला, ७०२, ए विंग, सी/६६, जी ब्लॉक, वन बीकेसी, बँक ऑफ बडोदासमोर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
संपर्क क्रमांक	०२५ - ४८८६ ७०००	०२२-६१७९८९५४
ईमेल आयडी	evoting@nsdl.com	secretary@india.cfasociety.org

इंडियन असोसिएशन ऑफ इन्व्हेस्टमेन्ट प्रोफेशनल्स करिता
सही/-
लितेश कोरशी गडा
संचालक
(डीआयएनः ०३३०७०५७)
ठिकाणः मुंबई
दिनांकः ०५ जुलै, २०२४

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

जेव्हा माणूस स्वतःला परिपूर्ण समजतो तेव्हाच त्याच्यातील अहंकार जागा होतो.

पंचांग

शुक्रवार ५ जुलै, २०२४
शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर
ज्येष्ठ अमावास्या
नक्षत्र : आर्द्रा

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मिथुन

रवी उदय- ०६-०७
रवी अस्त- १९-१९

दर्श अमावास्या, सूर्य पुनर्वसूला रात्री ११.३९ वाहन हत्ती, अमावास्या उत्तर रात्री ४.२६ पर्यंत

पाककृती

कांदा कचोरी

★**साहित्य** - २०० ग्रॅम मैदा, ३ चमचे बेसन, २ ते ३ मध्यम कांदे तुकडे केलेले, २ -३ हिरवी मिरची, ४ उकडलेले बटाटे, २ चमचे कोथिंबीर, १ टीस्पून तेल, दीड चमचे काश्मिरी लाल तिखट, दीड टीस्पून चाट मसाला, १/२ टीस्पून गरम मसाला, १/२ टीस्पून ओवा, ५ ते ६ टीस्पून तेल, १ चमचा काळे मीठ, १/२ टीस्पून हिंग, मीठ चवीनुसार

★**कृती** - एका कढईत तेल, कोथिंबीर आणि हिंग घालून शिजवा. यानंतर पॅनमध्ये बेसन, तिखट, काळे मीठ, चाट मसाला आणि गरम मसाला घालून आणखी काही मिनिटे परतून घ्या. आता कढईत चिरलेला कांदा, मीठ आणि हिरवी मिरची घालून कांदा मऊ होईपर्यंत शिजवा. नंतर बटाटे घालून सर्व चांगले मिक्स करा. आता हे मिश्रण थंड होण्यासाठी ठेवा. कचोरीचे पीठ तयार करण्यासाठी मैदा, ओवा, मीठ आणि तेलाच्या मदतीने मऊ पीठ मळून घ्या. पीठ मळून झाल्यावर ओल्या कपड्याने झाकून अर्धा तास तसेच ठेवा. ठरलेल्या वेळेनंतर मळलेल्या पिठाचे समान आकाराचे गोळे बनवा. त्यात कांदा आणि बटाट्याच्या मिश्रणाचे सारण भरा आणि चारही बाजूने नीट बंद करून कचोऱ्या हाताने लाटून घ्या. कचोरी मध्यम-मंद आचेवर तपकिरी होईपर्यंत तळा. तुमची टेस्टी कांद्याची कचोरी तयार आहे.

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

MANAPPURAM HOME FINANCE LTD.
मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
पूर्वीची मनप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.
सीआयएनः U65923K12010PIC039179
नोंद. कार्यालयः IV/४७०ए (जुना) W/६३८ए (नवीन) मनप्पुरम हाऊस वलपाड थ्रिशूर, केरळ ६८०५६७
कॉर्पो. कार्यालयः मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्र. ३०१ ते ३१५, ए विंग, 'कनाकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३, महाराष्ट्र. दूरध्वनी क्र.: ०२२-६६२११०००, वेबसाईटः www.manappuramhomefin.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी **मनप्पुरम होम फायनान्स लि.** ("एमएएचओएफआयएल") चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट *(कायदा), २००२ (५४/२००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियमन ९ सह वाचावयाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार आण